**L. A. BILL No. VI OF 2024.**

A BILL

FURTHER TO AMEND THE DR. BABASAHEB AMBEDKAR TECHNOLOGICAL UNIVERSITY ACT, 2014.

**सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६.**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

२०१४ चा महा. २९.

**ज्याअर्थी** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.



(शा.म.मु.) एचबी ३१४१(१४०—२-२०२४)

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**२.** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ६ मध्ये, " माध्यम इंग्रजी " या मजकुरानंतर, " किंवा मराठी " हा मजकूर, जादा दाखल करण्यात येईल आणि तो, २० जुलै २०२३ पासून जादा दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल. २०१४ चा महा. २९.

व्यावृत्ती.

**३.** मुख्य अधिनियमात किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांत, विनियमांत, परिनियमांत अथवा अध्यादेशांत किंवा, यथास्थिति, काढलेल्या कोणत्याही आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, मराठी भाषेतून चालविला जात असलेला कोणताही पदवी अभ्यासक्रम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२४, याद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमानुसार चालविण्यात आला असल्याचे मानण्यात येईल. २०२४ चा महा. .....

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६. ]**

**[ डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

[**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.]

[ **विधानसभेने दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.**]

[ **विधानपरिषदेने दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.**]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई